## सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद नाशिक
### करार पध्दतीवर कर्मचारी आदेश

**वाचा :-**१) मा. राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, मुंबई यांचे पत्र क्र मप्राशिप /सशिअ /प्रशा-१/२०१६-१७/१८३२ दि.२५ जुलै २०१६.
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक जा.क्रं.सशिअ/सकाअ.२/७८/२०१६ दिनांक ३/१०/२०१६.
३) मा.राज्य प्रकल्प संचालक,म.प्रा.शि.प.मुंबई यांचे जा.क्रं.मप्राशिप/सशिअ/प्रशा-१/डाटाएन्ट्री-बदली/२०१७-१८/दि.३०/०६/१७.
४)मा.राज्य प्रकल्प संचालक,म.प्रा.शि.प.मुंबई यांचे जा.क्रं.मप्राशिप/सशिअ/प्रशा-१/सा-व्य-बदली/२०१७-१८/१४५९दि.३०/०६/१७.
५)मा.राज्य प्रकल्प संचालक,म.प्रा.शि.प.मुंबई यांचे जा.क्रं.मप्राशिप/सशिअ/प्रशा-१/आपसीबदली/२०१७-१८/१४५८दि.३०/०६/१७.
६)मा.राज्य प्रकल्प संचालक,म.प्रा.शि.प.मुंबई यांचे जा.क्रं.मप्राशिप/सशिअ/प्रशा-१/समावेशित/२०१७-१८/१४५७दि.३०/०६/१७.
७)मा.राज्यप्रकल्प संचालक,म.प्रा.शि.प.मुंबई यांचे जा.क्रं.मप्राशिप/सशिअ/प्रशा-१/MIS-Cबदली/२०१७-१८/१४६०दि.३०/०६/१७.
८) कार्यालयीन टिपणी दिनांक १७/०७/२०१७.

## पदस्थापना आदेश

सर्व शिक्षा अभियान, जि.प.नाशिक.
जा.क्र./सशिअ / सकाअ २/ 97 /१७.
नाशिक दिनांक :- 10/०८/२०१७.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय ), मुंबई अंतर्गत सर्व शिक्षा अभियान, अंतर्गत जिल्हास्तर, गटस्तर व DIECPD या कार्यालयाकडे विविध पदांवर करारतत्वावर कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. इतर जिल्हयामध्ये कार्यरत कर्मचा-यांची महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयाने उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ७ अन्वये जिल्हा बदली करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानूसार खालील कर्मचारी हे नाशिक जिल्हा परिषदेकडे जिल्हा बदलीने हजर झालेले आहेत. त्यांना पदनिहाय त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तालुक्याच्या ठिकाणी ते नाशिक जिल्हयात हजर झाल्याच्या दिनांकापासून ते ३०/०९/२०१७ या कालावधीत आदेशासोबत नमुद केलेल्या अटी व शर्तीवर त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या एकत्रित पारिश्रमिकावर पदस्थापना देण्यात येत आहे. त्यांच्या यापुर्वीच्या नियुक्ती आदेशामध्ये अटी व शर्ती हया पुर्वी प्रमाणेच लागू राहतील.

| अ.क्र | नांव | पदनाम | नियुक्तीचे ठिकाण | पारिश्रमिक रू. |
|---|---|---|---|---|
| 1) | श्री धनराज खंडू सुर्यवंशी | विषय साधन व्यक्ती | नांदगाव | 27923/- |
| 2) | श्री अभिनंदन बापुराव धात्रक | विषय साधन व्यक्ती | कळवण | 27923/- |
| 3) | श्री नामदेव गोविंद महाले | विशेषतज्ञ ( IE) | कळवण | 27923/- |
| 4) | श्री विजयकुमार गोदू कु-हे | विशेषतज्ञ ( IE) | नाशिक | 27923/- |
| 5) | श्री अनंत ताराचंद गायकवाड | विशेषतज्ञ ( IE) PSY. | बागलाण | 27923/- |
| 6) | श्री जयंत कारभारी शिंदे | MIS समन्वयक | नांदगाव | 27923/- |
| 7) | श्रीमती शितल मानसराम महाजन | MIS समन्वयक | देवळा | 27923/- |
| 8) | श्रीमती मनिषा रमेश शिंपी | डाटा एन्ट्री ऑपरेटर | मालेगांव | 22154/- |
| 9) | श्रीमती कल्पना रमेश गुरव | विशेष शिक्षक | चांदवड | 20500/- |
| 10) | श्री संजय भाईदास पाटील | विशेष शिक्षक | पेठ | 20500/- |
| 11) | श्रीमती प्रियंका रामदास पगार | विशेष शिक्षक | देवळा | 20500/- |
| 12) | श्रीमती शेवंता शंकर भागवत | विशेष शिक्षक | चांदवड | 20500/- |
| 13) | श्रीमती पुजा प्रकाश जाधव | विशेष शिक्षक | कळवण | 20500/- |
| 14) | श्रीमती सुचिता मुरलीधर भारजकर | विशेष शिक्षक | चांदवड | 20500/- |
| 15) | श्रीमती ललिता उत्तम अहिरे | विशेष शिक्षक | सुरगाणा | 20500/- |

### अटी व शर्ती :

१) उमेदवारांनी पदस्थापना दिलेल्या ठिकाणी तात्काळ रूजू होणे बंधनकारक आहे. सदर पदस्थापनेमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल केले जाणार नाही. यासाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

# सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद नाशिक

**करार पध्दतीवर कर्मचारी आदेश**

---

२) उमेदवारास रूजु होतांना रूपये १००/- च्या मुद्रांकावर सेवाकरारनामा लिहुन देणे बंधनकारक आहे. त्याचा खर्च उमेदवारास स्वतः करावा लागेल याची त्यांनी नोंद घ्यावी.

३) सदर नियुक्ती करतांना कर्मचा-यांना विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र रु.१० चा कोर्ट फी स्टॅम्प लावून सादर करणे आवश्यक आहे. सदर नेमणूका हया फक्त सर्व शिक्षण अभियानसाठी वर नमुद कालावधीसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाच्या करार तत्वावर (Contract Basis ) करण्यात येत आहे.

४) नेमणूकीच्या कालावधीत म.प्रा.शि.प. मुंबई कार्यालयाच्या नियमानूसार ठरवून दिल्यानूसार संबंधित उमेदवाराच्या नावासमोर दर्शविलेली ठराविक रक्कम एकत्रित पारिश्रमिक म्हणून देण्यात येईल. करार कालावधीमध्ये एकत्रित पारिश्रमिकामध्ये कोणताही बदल होणार नाही.

५) सदरचे काम हे हंगामी स्वरुपाचे असल्यामुळे सदरच्या नेमणूका फक्त वरील कालावधीसाठी करण्यात येत असून सदर कालावधीत आपले काम असमाधानकारक आढळून आल्यास कोणत्याही वेळी कोणतीही पुर्व सुचना न देता सेवा करार तात्काळ रद्द करून नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

६) सेवा कराराच्या कालावधीत सदर कर्मचा-यास अन्य ठिकाणी कोणतेही काम स्विकारण्यास मनाई राहील. सेवा समाप्तीनंतर सेवेबाबत इतर हक्क प्रस्थापित करता येणार नाहीत. सदर सेवा करार हा संबंधितीत उमेदवारास एक महिन्याच्या पूर्व सुचनेने समाप्त करता येईल.

७) नियुक्ती कालावधीत संबंधित उमेदवारांना पूर्णतः स्वतःच्या जबाबदारीवर काम करावे लागेल. कार्यालयीन कामकाज करतांना सर्व यंत्र सामुग्रीचा काळजीपुर्वक वापर करुन सदर यंत्राचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे बंधनकारक आहे. नेमून दिलेल्या जॉब चार्टप्रमाणे कामकाज करणे व कार्यालयीन बाबींची गोपनियता ठेवणे आवश्यक आहे.

८) सदर आदेशाचा कालावधी दिनांक ३०/०९/२०१७ रोजी संपुष्टात येवून सदर संबंधित सर्व उमेदवारांच्या सेवा व सेवाकरार आपोआप संपुष्टात येईल. सदर सेवा समाप्तीनंतर संबंधित कर्मचा-यांच्या कोणतेही सेवा दायित्व सर्व शिक्षा अभियान या प्रकल्पावर राहाणार नाही.

९) सेवा समाप्तीनंतर जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा सेवेतील कोणत्याही संवर्ग पदावर कर्मचा-यांचा हक्क राहणार नाही.

१०) विषय साधन व्यक्ती व विशेषतज्ञ IE यांना प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नाशिक यांनी दिनांक २१/८/२०१४ च्या शासन निर्णयानूसार सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या अंमलबजावणी संदर्भात, प्रशिक्षणा संदर्भात, अथवा शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या दृष्टिने देण्यात आलेल्या कोणतेही कामकाज करणे बंधनकारक राहील.

११) डाटा एन्ट्री ऑपरेटर , विशेष शिक्षक व MIS समन्वयक यांनी गटशिक्षणाधिकारी व वरिष्ठ कार्यालय यांनी वेळोवेळी सांगितलेले कामकाज वेळेत करणे बधनकारक आहे.

10/06/17

चेअरमन
जिल्हा कार्यकारी समिती
जिल्हा नाशिक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक.

**प्रत- १) मा.राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.**
**२) प्राचार्य, DIECPD,नाशिक. ३) लेखाधिकारी, सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, नाशिक**
**४) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती ------------------ , जि. नाशिक.**
**५) स.शि.अ., जिल्हा कार्यालय, नाशिक यांना कार्यवाहीस्तव ६) सर्व संबंधित उमेदवारांना श्री/ श्रीमती--------------**